# <u>प्रेस नोट</u>

## —: "पोलीस शिपाई चालक" व "पोलीस शिपाई भरती" सन २०१९ :—

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर सुरु असलेल्या पोलीस भरती—सन २०१९ च्या अनुषंगाने आवेदनपत्र सादर केलेल्या उमेदवारांना सुचित करण्यात येते की,

१. "पोलीस शिपाई चालक" पदाची लेखी परिक्षा दि.२२.०९.२०२१ रोजी व " पोलीस शिपाई " पदाची लेखी परिक्षा दि.२४.०९.२०२१ रोजी घेण्यात येणार आहे. सदर परिक्षेचे प्रवेशपत्र (Admit Card) डाउनलोड करण्यासाठी उमेदवारांना http://mahapolicerc.mahaitexam.in/ ही वेबलिंक दि.१६.०९.२०२१ रोजी सायकांळी ०४.०० वाजेपासुन उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. उमेदवारांची लेखी परिक्षा वरील दिनांकास **सकाळी ११.०० ते १२.३०** या वेळेत घेण्यात येईल. परिक्षा केंद्रात सकाळी १०.०० वाजेपर्यंतच उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल. त्यानंतर येणा—या उमेदवारांना परिक्षा केंद्रात प्रवेश देण्यात येणार नाही.

३. उमेदवारांनी परिक्षेसाठी त्यांचे सोबत स्वत:चे प्रवेशपत्र (Admit Card) ,फोटो असलेले ओळखपत्र व काळा/निळा बॉलपेन या साहित्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही वस्तु सोबत आणु नयेत. या ३ वस्तुंव्यतिरिक्त इतर कोणत्याही वस्तु उदा.मोबाईल, पिशवी, डिजीटल घडयाळ आणु नयेत. चुकुन आणल्यास अशा वस्तु ठेवण्यासाठी अगर सांभाळण्यासाठी कोणतीही व्यवस्था परिक्षाकेंद्रावर नाही, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

(डॉ.जय जाधव)
अध्यक्ष, पोलीस भरती मंडळ तथा
पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई.